ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार, ४ सप्टेंबर. १९६८ | अंक १७



### राहत्या घरांची टंचाई वाढतच आहे

भारतामधील मोठ्या शहरांतून राहत्या जागांची टंचाई तीव्रतेने भासत आहे. परंतु ही टंचाई सर्व देशभरच पसरलेली आहे. शहरांची लोकसंख्या भरमसाठ वाढल्यामुळे तेथील घर-टंचाईची चर्चा अधिक होते इतकेच. लोकसंख्येची बेसुमार वाढ होत असल्यामुळे घरांची टंचाई वाढतच चालली आहे. दरसाल सुमारे १० लाख घरे ह्या वेगाने टंचाई पसरत चालली आहे. १९६१ साली करण्यात आलेल्या खानेसुमारीच्या वेळी घरांच्या टंचाईबद्दल माहिती जमा करण्यात आली होती. त्या वेळी ७·४१ कोटी राहत्या जागांची टंचाई होती. अलीकडे करण्यात आलेल्या अंदाजाप्रमाणे सध्या ८·१४ कोटी घरांचा तुटवडा आहे. हा तुटवडा दूर करावयाचा म्हटले तर त्यासाठी घर-बांधणीच्या कामावर ३० हजार कोटी रुपये खर्च करावे लागतील. ही प्रचंड रक्कम चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील खर्चाच्या दीडपट आहे. आतापर्यंतच्या तीन पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कामासाठी अगदी खालचा अनुक्रम लावलेला होता. ह्या तिन्ही पंचवार्षिक कार्यक्रमांत घरबांधणीत गुंतविलेल्या सार्वजनिक भांडवलाची रक्कम उतरत गेलेली आढळून येते. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमात सार्वजनिक गुंतवणुकीपैकी १६ टक्के रक्कम घरबांधणीवर खर्च झाली. दुसऱ्या कार्यक्रमांत गुंतवणुकीचे प्रमाण ८ टक्क्यांवर आले आणि तिसऱ्या कार्यक्रमात ७ टक्क्यांवर आले. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात तर गुंतवणूक ५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात आली आहे. भारताच्या लोकसंख्येपैकी ४१·३३ टक्के लोक एका खोलीतच आयुष्याचा गुजारा करतात. २९ टक्के लोक दोन खोल्यांच्या जागेत राहतात. १३·२५ टक्के लोक तीन खोल्यांच्या आणि ७·६४ टक्के लोक ४ खोल्यांत राहतात.

### तारीख दाखविणाऱ्या मनगटी घड्याळांचे उत्पादन

हिंदुस्थानात मशीन टूल्सच्या घड्याळांच्या कारखान्याचा ५वा वर्षदिन १५ ऑगस्टला साजरा करण्यात आला. ह्याच दिवशी कारखान्यात प्रथमच तारीख दाखविणाऱ्या घड्याळांचे उत्पादन करण्यास प्रारंभ झाला. घड्याळाचे नाव 'तारीख' हेच ठेवण्यात आले असून अशा मनगटी घड्याळांचे दोन प्रकार तूर्त बनविण्यात येणार आहेत. त्यापैकी एक निष्कलंक पोलादाचे व दुसरे सोन्याचे पाणी दिलेले असेल. ही घड्याळे चुंबकीय क्षेत्राला दाद न देणारी आणि धक्के सहन करणारी असतील. त्यांची किंमत १५० रुपयांच्या आसपास राहील. बंगलोर येथील कारखान्यात बऱ्याच प्रकारची घड्याळे तयार होतात. १९६८–६९ सालात ३ लाख, ५० हजार घड्याळे तयार करण्याचे लक्ष्य ठरविण्यात आले आहे. म्हणजे दररोज १ हजार घड्याळे होतात. 'तारीख' नमुन्याची २ हजार घड्याळे पहिल्या वर्षी बनविण्यात येणार आहेत.





**सरदारगृह**


**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**
**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ सरदारगृह प्रा. लि. तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES




**GADRE BANDHU**
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

# ☆ अर्थ ☆

बुधवार, सप्टेंबर ४, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । --कौटिलीय अर्थशास्त्र*

## धर्मांतराची सक्ती करण्याविरुद्ध कायदा

मध्यप्रदेश सरकारने सक्तीच्या धर्मांतराविरुद्ध कायदा करण्याचा मनसुबा रचला असून, त्यासंबंधीच्या कायद्याचे एक बिलही तयार केले आहे. राज्याच्या विधानसभेच्या येत्या अधिवेशनात ते मांडण्यात येणार आहे. बिलात सक्तीच्या धर्मांतराला तर बंदी करण्यात आली आहेच; पण अशा प्रकारच्या धर्मांतराचे प्रयत्न प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरित्या करण्यासही बंदी घातलेली आहे. त्यातील तरतुदीप्रमाणे धर्मांतराची जबरदस्ती कोणावरही करता येणार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारची आमिषे दाखवून अगर फसवूनही धर्मांतर करता येणार नाही. सक्तीच्या धर्मांतराचा गुन्हा शाबीत झाल्यास गुन्हेगाराला १ वर्षाची कैद अथवा पाच हजार रुपये दंड अगर दोन्ही शिक्षा देण्याची व्यवस्था बिलात करण्यात आली आहे. भारतात समाजसेवेच्या मिषाने येणारे ख्रिस्ती धर्मगुरू धर्मांतराचे काम करीत असतात. खुद्द बायबलमध्येच धर्मप्रसाराचा आदेश देण्यात आलेला आहे. भारतामधील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांत त्यांचे काम विशेष जोराने चालते. वास्तविक धर्मांतर ही बाब प्रत्येकाच्या विवेकबुद्धीवर सोपविण्यात आली पाहिजे. पण ख्रिस्ती धर्मगुरू आदिवासीसारख्या गरीबगुरीब जनतेला अनेक प्रकारची ऐहिक आमिषे दाखवून ख्रिस्ती होण्यास प्रवृत्त करतात. मनमाड भागातील शेतकऱ्यात काम करणारा स्पॅनिश धर्मगुरू फादर फेरेर ह्याला महाराष्ट्र सरकारने धर्मांतराच्या कारवाया करण्याबद्दल राज्यातून बाहेर जाण्यास सांगितले, ते ह्याचमुळे. मध्य प्रदेश सरकारने करू घातलेला कायदा कितपत यशस्वी होईल ते सांगता येत नाही; कारण सक्तीच्या धर्मांतराचा बिनतोड पुरावा मिळणे कठीण जाईल.

## टोळधाडीच्या संकटात सापडलेले देश

भारत, पश्चिम पाकिस्तान आणि सूडान ह्या देशांना सध्या टोळधाडीच्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे. भारत व पाकिस्तान ह्या संकटाला यशस्वीपणे तोंड देऊ शकतील. सूडानमध्ये मात्र वेगळी परिस्थिती आहे. सूडानमधून वाहणाऱ्या नाइल नदीच्या काठावर टोळ आपली अंडी विस्तीर्ण क्षेत्रावर घालीत आहेत. त्यामुळे त्या देशाच्या कापसाच्या पिकाला धोका उत्पन्न झाला असून ४·८ कोटी पौंड किमतीचा कापूस नष्ट होतो की काय असे वाटू लागले आहे. सुमारे दीड महिन्यापूर्वी राजस्थानातील बारमेर जिल्ह्यात टोळांचा एक प्रचंड थवा आढळून आला. त्याचा पसारा ३४ चौरस किलोमीटर इतका मोठा होता. भारत सरकारच्या अन्नखात्याने टोळधाडीविरुद्ध प्रभावी उपाय योजण्याची व्यवस्था केली आहे. हिंदी शास्त्रज्ञांनी टोळांचा नाश करणारे एक उपयुक्त जंतुनाशक शोधून काढले आहे. हे जंतुनाशक कडुनिंबाच्या बियांपासून तयार केलेले असून शेतकऱ्याला सुद्धा ते बनविता येण्यासारखे आहे. तथापि शेकडो एकरांवर पसरलेल्या पिकावर फवारण्यासाठी त्याचा उपयोग करता येणे अवघड आहे. टोळधाड हे पिकांचा नाश करणारे भयंकर संकट असून त्याचा मुकाबला करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुरस्काराने ४० देशांनी एक योजना तयार केली आहे. भारतही योजनेत सामील झाला आहे. ती अमलात आणण्यासाठी २ लाख, ८५ हजार डॉलर्स खर्च येणार आहे. एक टन वजनाचे टोळ २५० माणसांचे एका दिवसाचे अन्न फस्त करू शकतात. वाळवंटात उत्पन्न होणारे टोळ जगातील १·१ कोटी चौरस मैल जमीन उजाड करू शकतात. टोळधाडीचा बंदोबस्त नीट झाला नाही तर भारत, पाकिस्तान आणि पश्चिम आशिआ ह्यांना विशेष धोका आहे.

---

## जपानला मीठ निर्यात करण्याचा करार

जपान आणि भारत ह्यांच्या दरम्यान पुढील वर्षाच्या जून-अखेरपर्यंत ३·३० लाख टन मीठ निर्यात करण्याचा करार झाला आहे. ही निर्यात भारताच्या सरकारी व्यापार महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. मिठाची किंमत सुमारे ७० लाख रुपये होईल. भारत आशिआ व आफ्रिका ह्या खंडांतील अनेक देशांना दरसाल मीठ निर्यात करतो. तथापि जपान हे भारताचे सर्वांत मोठे गिऱ्हाईक आहे. गेल्या वर्षी जपानने भारताकडून ५ लाख टन मीठ आयात केले. चालू वर्षी जपान मिठाची आणखीही मागणी करील असा अंदाज आहे. सौराष्ट्रातील मिठाच्या उत्पादनावर मागणी येणे अवलंबून आहे. सध्या तरी वाईट हवामानामुळे तेथील उत्पादन घटण्याची शक्यता दिसत आहे. जपानखेरीज फिलिपाइन्स बेटे, सिंगापूर, पूर्व आफ्रिका आणि कांगो ह्या देशांना ५० हजार टन मीठ निर्यात करण्यात येणार आहे.

---

# शिकतात भारतात, खपतात अमेरिकेत

"भारताची औद्योगीकरणाची शिकस्त चालू असताना सुमारे १०,००० पदवीधर एंजिनिअर नोकरीच्या शोधात वणवण हिंडत आहेत. दिल्लीमधील अशा काही बेकार इंजिनिअरांनी आपली दाद लावून घेण्यासाठी बेकार इंजिनिअरांची सोसायटी स्थापन केली आहे," अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. बेकारीचा हा आकडा अतिरंजित असला, तरी प्रतिष्ठेच्या एंजिनिअरांच्या बालेकिल्ल्यात बेकारीने प्रवेश केला आहे हे स्पष्ट आहे.

भारताच्या खर्चाने शिकून तयार झालेले भारतीय तरुण एंजिनिअर, शास्त्रज्ञ आणि डॉक्टर फार मोठ्या संख्येने अमेरिकेकडे धाव घेत आहेत, त्यामुळे भारत या डॉक्टर व एंजिनिअर यांच्या ज्ञानाच्या उपयोगाला मुकत आहे अशी तक्रार चालू असतानाच वरील बातमी वस्तुस्थितीवर दुसऱ्या बाजूने प्रकाश टाकीत आहे.

बाजारपेठ खुली असली, म्हणजे जेथे किंमत जास्त येते तेथे माल नेऊन विकला जातो. खेडेगावातील दूध शहरात विक्रीला येते, पण खेडेगावात ते औषधालाही मिळणे कठीण जाते. कारण, जास्त किंमतीच्या दिशेने दूध धाव घेते. काही विशिष्ट प्रकारचे शिक्षण घेतलेल्या हिंदी तरुणांना अमेरिकेत इथल्या मानाने किती तरी पटीने जास्त पगार मिळू शकतो, सुखसोयींचा लाभ होतो. त्यामुळे ते तिकडे आकृष्ट झाले तर नवल नाही.

अविकसित देशांच्याकडून विकसित देशांच्याकडे–भारतातून अमेरिकेकडे–अशा तरुणांची जी रीघ लागते तिची कारणे वास्तविक मुख्यतः आर्थिक असतात. पण जाणारे लोक त्यांवर पांघरूण घालून इतर कारणांवरच भर देतात. "आमच्या ज्ञानाला येथे वाव मिळत नाही, वरिष्ठांना आमचा हेवा वाटून ते आम्हांला दाबून ठेवू पाहतात, साधनसामग्री नसते, परदेशातील अनुभव वाया जातो, भारताकडे परतण्याजोगे भारतात काही दिसतच नाही, आम्ही परदेशांतच सरस्वतीची आणि जनतेची खरी सेवा करू शकतो—" इत्यादी कारणांपैकी काही कारणे काहींच्या बाबतीत थोडीफार खरी असतीलही. परंतु परदेशगमनाच्या निर्णयाचे समर्थन करण्यासाठीच प्रायः ती पुढे केली जातात; डॉ. नारळीकरांच्यासारखे अपवादच होत.

स्वातंत्र्यप्राप्तीने तर औद्योगिक विकासाला आणि राहणीमानाच्या सुधारणेला अग्रस्थान देण्यात आले आणि त्या क्षेत्रातील लोकांना चांगला दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे बुद्धिमान तरुणांच्या शास्त्रज्ञ, एंजिनिअर, डॉक्टर होण्याच्या महत्त्वाकांक्षेला सरकारने प्रोत्साहन दिले; त्याला आवश्यक त्या शिक्षणाच्या सोयी वाढविण्यात आल्या. कॉलेजांची संख्या वाढविण्यात आली. त्यांतून बाहेर पडणाऱ्या तरुणांच्या अपेक्षा उंचावल्या, लग्नाच्या बाजारातही त्यांचा भाव वाढला. परदेशी शिक्षणाचा आणि पदव्यांचाही भाव वाढत गेला. तरुण स्वतःच्या उत्कर्षाच्या दृष्टीने वागू लागले. भूक लागावी ह्यासाठी डॉक्टरांनी सांगितलेले टॉनिक घ्यावे; पण ती भूक भागविण्याची सोय नसावी, असाच प्रकार तरुणांच्या बाबतीत झाला.

विद्यार्थी शिकवून तरबेज करण्यासाठी शिक्षणाच्या काही शाखांतून प्रत्येक विद्यार्थ्यागणिक सरकारचा, म्हणजे समाजाचा, सहस्रावधी रुपये खर्च होतो. हे विद्यार्थी परदेशी जाऊन तेथे नोकरी करू लागले म्हणजे हा खर्च वाया गेल्यासारखाच होतो. अमेरिकेसारख्या देशाला अविकसित देशातून होणारी तरुणांची ही आयात किफायतशीरच ठरते; कारण त्याला शिकून तयार झालेले तरुण आयते मिळतात. श्रीमंत देशालाच दरिद्री देशांची खंडणी मिळते.

अन्नधान्याची आयात आपण करू लागलो, त्याचा हेतू दीर्घकालीन शेतीयोजना पुऱ्या होऊन अंतर्गत धान्योत्पादन वाढविण्यास जो अवधी लागेल, तेवढ्यापुरती सोय करणे हा होता. ही आयात आता नित्याची होऊन बसली आहे. शेतीचे उत्पादन वाढले म्हणजे भारताचा सर्वांगीण अभ्युदय होईल आणि त्यासाठी तज्ज्ञ तरुणांची आवश्यकता लागेल; तरुणांना ते आवाहन स्वीकारण्याचा आनंद लुटायला मिळेल ह्या अपेक्षा फोल ठरू लागल्या; तरुणांचा उत्साहभंग झाला; त्यांना बऱ्यापैकी नोकरी मिळणेही कठीण झाले आणि उद्योग-विनिमय केंद्रातील बेकारांच्या गर्दीत सामील होण्याची पाळी आली, तर ते तरुण बहिर्गमनास प्रवृत्त का नाही होणार ?

खेड्यातील लोक शहरांकडे आकृष्ट होत आहेत. कारण तेथे उद्योगधंद्याला अधिक संधी आहे; अधिक सोयीसवलती आहेत; काम नको असणारांना भिक्षा मिळण्यासही अधिक वाव आहे ! भारतातील एका राज्यातील लोक दुसऱ्या राज्यात ह्याच दृष्टीने जात आहेत; अविकसित देशातील तरुण अमेरिकेकडे ह्याच कारणासाठी जाण्याची धडपड करीत आहेत. त्या सर्वांना स्वतःच्या घरी, स्वतःच्या क्षेत्रात, स्वतःच्या प्रदेशात, मायदेशी उत्पादक घटक म्हणून राहण्याजोगी परिस्थिती निर्माण करणे हे राज्यकर्त्यांचे म्हणजे समाजाचे कार्य आहे.

नदीला योग्य ठिकाणी धरण बांधून त्यातले काही ठराविक पाणी वीजनिर्मितीसाठी वापरतात, तर काही ठराविक पाणी कालव्यांच्या द्वारा शेतीला पुरवितात. काही पाणी नदीच्या पात्रातून वाहू देतात. धरणाच्या पाण्याखाली ज्यांची घरे व शेते बुडून जातात त्यांची दुसरीकडे सोय करावी लागते. व्यापक हिताच्या दृष्टीने ही सर्व योजना केली जाते. तरुणांच्या शिक्षणाला आणि परदेशगमनालाही असेच नियोजनपूर्वक वळण लावायला हवे.

श्री. वा. काळे

( किर्लोस्कर, ऑगस्ट, १९६८ )

## आर्थिक मदतीमागील राजकीय हेतू थंडावत चालले

विकसनशील देशांना आर्थिक मदत देणाऱ्या देशांचा जो गट आहे त्यांच्या धोरणांत बदल होऊ लागल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची कम्युनिस्ट राष्ट्रगट आणि कम्युनिस्टेतर राष्ट्रगट अशी फाळणी निदान व्यवहारात तरी झाली. त्याचा एक परिणाम असा झाला की, अविकसित देशांचा विकास घडवून आणण्यासाठी दोन्ही गटांतील देश एकमेकांशी स्पर्धा करू लागले.–नव्याने स्वतंत्र झालेल्या पण आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांना आपल्या कच्छपी लावण्याचे दोन्ही गटांचे हे प्रयत्न काहीसे यशस्वीही झाले. पण आता कम्युनिस्ट राष्ट्रगटाचा म्होरक्या रशिआ आणि भांडवलदारी गटाची पुढारी अमेरिका ह्या देशांत चीनच्या भयाने सहकार्याचे वातावरण निर्माण होऊ पाहात आहे. त्यामुळे मदत देणारे दाते देश परदेशांना देण्यात येणाऱ्या मदतीत कपात करू लागले आहेत. उभय गटांत आतापर्यंत चालू असलेल्या थंड्या राजकीय युद्धाची तीव्रता कमी होऊ लागल्यामुळे मागासलेल्या देशांतून मित्र गोळा करण्याची पुढारलेल्या देशांना पहिल्याइतकी आवश्यकता वाटत नाही. शिवाय, दिलेल्या मदतीचा उपयोग त्यांच्या दृष्टीने जितका व जसा व्हावयास पाहिजे तितका व तसा तो होत नसावा अशीही शक्यता आहे. त्याचप्रमाणे देशातील काही अंतर्गत गरजा भागविण्याकडेही त्यांचा अधिक कल दिसू लागला आहे. मदत घेणाऱ्या देशांना अमेरिकेकडून असे सुचविण्यात येत आहे की, ह्यापुढे त्यांनी परदेशांकडून पैसा मिळविण्याच्या कामी खाजगी मालकीच्या भांडवलावर अधिक प्रमाणात अवलंबून राहावे. कम्युनिस्ट गटातील देशांना हा मार्ग अर्थातच खुला नाही.

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांनी परदेशांना मदत करण्यासाठी २०० कोटी, ५४ लाख डॉलर्सची मागणी केलेली होती. परंतु काँग्रेसने १०० कोटी इतकीच रक्कम मंजूर केली आहे. अमेरिकेने आणखीही दोन संघटनांकडून मिळणाऱ्या मदतीला नकार दिला आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या भांडवलाच्या उभारणीसाठी २० कोटी डॉलर्सची रक्कम देण्याचे अमेरिकेने कबूल केले होते. त्याचप्रमाणे जागतिक बँकेच्या आंतरराष्ट्रीय विकास संघटनेला अमेरिकेकडून १६ कोटी डॉलर्स मिळावयाचे होते. आता ह्या दोन्ही रकमांबद्दल साशंकता निर्माण झाली आहे. अमेरिकेप्रमाणे रशिआची मदतही कमी होऊ लागली आहे. १९६७ साली रशिआकडून मिळणाऱ्या मदतीचा आकडा सात कोटी डॉलर्स इतका खाली आला. अमेरिकेने मदत कमी करण्याचे धोरण स्वीकारले, त्याचा परिणाम रशिआवरही झालेला दिसतो. तथापि जगाच्या ज्या भागाचे लष्करीदृष्ट्या महत्त्व आहे त्या भागातील देशांना मात्र अजूनही कमीअधिक प्रमाणात मदत चालू राहील असे दिसते. अर्थात अशा मदतीमागील राजकीय हेतू उघड असतात. भूमध्य समुद्राच्या विभागात आपले वजन राखण्यासाठी रशिआची खटपट चालू आहे. त्याची एक खूण म्हणजे रशिआने तुर्कस्थानला दिलेली २० कोटी डॉलर्सची मदत. अमेरिकेकडून तुर्कस्थानला औद्योगिक विकासासाठी मदत मिळत आहे. ह्या मदतीशी स्पर्धा करण्यासाठी रशिआही मदत देत आहे. भारत आणि पाकिस्तान ह्यांनाही ह्याच धोरणाच्या चौकटीत मदत मिळत राहणार असे दिसत आहे. जपान व पश्चिम जर्मनी हे दोनच देश असे आहेत की, ज्यांनी आपल्या मदतीत वाढ करण्याचे धोरण स्वीकारले आहे. पण तेथेही घरच्या प्रश्नांना अधिक प्राधान्य देण्याची वृत्ती वाढत आहे.

**मनगटावर वापरावयाचा 'मिनि' रेडिओ**—रिस्टवॉचच्या आकाराचा छोटा रेडिओ जपानमध्ये बनविण्यात येऊ लागला असून तो मनगटावर लावता येईल. त्याचे मोजमाप ४८–४६–१८ मिलिमीटर्स आहे.

**एक वर्षात रेल्वेचे १,१९४ अपघात**—१ मार्च, १९६७ ते ३१ मार्च, १९६८ ह्या मुदतीत हिंदी रेल्वेजवर आगगाड्यांचे १,१९४ अपघात झाले. त्यांत २३४ मरण पावले आणि १,०५१ जखमी झाले. रेल्वेच्या मालमत्तेला १·५९ कोटी रुपयांचे नुकसान पोचले.


# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

**आणखी दोन शाखा**

शाखा क्र. ३२

**जळगांव**

१०१ नवी पेठ

शाखा क्र. ३३

**धुळे**

१४२२, ४ थी गल्ली ( खोलगल्ली )

येथे १५ ऑगस्ट रोजी सुरू केल्या आहेत.

वि. श्री. दामले
जनरल मॅनेजर

द. रा. पंडित
शाखाधिकारी जळगांव

अ. दि. बुडूख
शाखाधिकारी, धुळे.

## फळांच्या व भाजीपाल्याच्या निर्यातीची योजना

इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ फॉरिन ट्रेड ह्या संघटनेने फळांच्या व भाजीपाल्याच्या निर्यातीसंबंधी २२ देशांतील बाजारपेठांचा अभ्यास करून भारतामधील फळे व भाजीपाला ह्यांचा निर्यातीविषयी एक कार्यक्रम सुचविला आहे. पाहणीत जमविलेल्या माहितीच्या आधाराने जे निष्कर्ष काढण्यात आले आहेत, त्यांच्या व निर्यातीसंबंधीच्या शिफारसींची चर्चा करण्यासाठी एक परिसंवाद भरविण्यात आला होता. संघटनेने आपल्या अहवालात फळे व इतर नाशवंत मालाच्या निर्यातीसाठी तीन स्वतंत्र व्यवस्था करण्यात याव्या असे सुचविले आहे. केळयांच्या निर्यातीसाठी एक, इतर फळे व भाजीपाला ह्यांच्या निर्यातीसाठी एक आणि डबाबंद फळे व भाज्या ह्यांच्या निर्यातीसाठी एक अशा स्वतंत्र संघटनांचा पुरस्कार अहवालात करण्यात आला आहे. सध्या ह्या वस्तूंची दरसाल निर्यात सुमारे १ लाख, १६ हजार टन होते. १९७०–७१ सालात ती १ लाख, ६० हजार टनापर्यंत वाढविण्यात यावी आणि १९७५–७६ पर्यंत निर्यात ४ लाख, ५० हजार टनांपर्यंत वाढविण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली आहे. निर्यातीची ही उद्दिष्टे गाठण्यासाठी येत्या ५ वर्षांच्या अवधीत ४० कोटी रुपयांची भांडवल–गुंतवणूक करावी लागेल, असा अंदाज करण्यात आला आहे. बागायतीबद्दलचे संशोधन, माल व्यवस्थित भरण्याच्या आधुनिक सोयी, डबाबंद अन्नपदार्थ तयार करणाऱ्या कारखान्यांचे आधुनिकीकरण, परदेशी तंत्रज्ञांचे सहकार्य, विक्रीची व्यवस्था, इत्यादी अनेक क्षेत्रांत भांडवलगुंतवणूक विभागली जावी असे संघटनेचे मत आहे. परदेशांतील बाजारपेठा मिळविण्याच्या दृष्टीने मालाचा दर्जा व त्याचे पॅकिंग ह्यासंबंधी प्रमाणित व्यवस्था करण्याचेही सुचविण्यात आले आहे.

## यंत्रचलित नांगरांचा कारखाना

दोन चाकांवर चालणाऱ्या यंत्रचलित नांगरांचा एक कारखाना बंगलोर येथे जपानच्या सहकार्याने काढण्यात येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. तो निमसरकारी मालकीचा राहील. कारखान्यात तयार होणारा पहिला नांगर चालू वर्षअखेर बाहेर पडेल असा अंदाज आहे. कारखान्याची उभारणी टप्प्याटप्प्याने करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात दरसाल ६ हजार नांगर तयार करण्यात येतील. दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर दरसाल १२ हजार नांगर तयार होऊ लागतील. बंगलोरपासून ७ मैलांवर कारखान्यासाठी १६ एकर जमीन म्हैसूर सरकारने राखून ठेवली आहे. ४५ लाख रुपये भांडवल सरकार व जपानी कंपनी घालणार आहे. बाकीच्या भांडवलाची उभारणी सार्वजनिक विक्रीने करण्यात येणार आहे.

## हिंदी टेलिप्रिंटर्सची निर्यात होऊ लागली

हिंदमध्ये तयार करण्यात आलेले टेलिप्रिंटर्स आता परदेशांत निर्यात होऊ लागले आहेत. मद्रास येथील हिंदुस्थान टेलिप्रिंटर्स लि. ह्या कारखान्याकडे सीलोनने टेलिप्रिंटर्स आणि तदनुषंगिक साहित्य ह्याची २·४ लाख रुपयांची मागणी नोंदविली आहे. ही यंत्रे तयार करण्याचा कारखाना एका इटालिअन कंपनीच्या सहकार्याने काढण्यात आलेला असून सहकार्याच्या करारातील शर्तीस अनुसरून पहिल्या दोन वर्षांत अफगाणिस्तान, ब्रह्मदेश, कांबोडिआ, सीलोन, लाओस, व्हिएटनाम, पाकिस्तान व नेपाळ ह्या देशांनाच टेलिप्रिंटर्स निर्यात करता येतील. त्यानंतर मात्र माल कोठल्याही देशाला निर्यात करता येईल. ह्या कारखान्यात चालू आर्थिक वर्षात हिंदी भाषेतील ८०० टेलिप्रिंटर्स तयार करण्यात येतील. त्यामुळे ४९ लाख रुपयांचे परदेशीय चलन वाचेल.

## हिऱ्यांना पैलू पाडण्याच्या धंद्याची स्थापना

मध्यप्रदेशातील विंध्य पर्वताच्या भागात प्रसिद्ध पन्नाच्या हिऱ्याच्या खाणी आहेत. ह्या गावी आता हिऱ्यांना पैलू पाडण्याच्या उद्योगधंद्याची स्थापना करण्यात येणार आहे. मध्यप्रदेश सरकारने हा निर्णय घेतला असून धंद्यात काम करू इच्छिणाऱ्यांसाठी अनेक सवलती देण्याचा विचारही करण्यात येत आहे. कर्ज, पैलू पाडण्याच्या यंत्रसामग्रीची खरेदी, कर, इत्यादी बाबतीत सवलती देण्याचा सरकारचा मानस आहे. सुमारे दोन हजार कारागिरांना रोजगार देणारे ५० छोटेखानी कारखाने पन्ना येथे काढण्यात येणार आहेत. त्यासंबंधी मध्यवर्ती सरकारच्या संबंधित खात्याशी राज्य सरकारने विचारविनिमय केला आहे. पन्ना येथे एके काळी हिऱ्यांना पैलू पाडण्याचा धंदा भरभराटीत होता. परंतु भांडवलाच्या अभावी आणि आधुनिक तंत्राच्या अभावी तो मोडकळीस येऊन बसला.

## मानसिक रुग्णांच्या संख्येत वाढ

सर्वच जगात मानसिक रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत चालली आहे, आणि ह्याचे मुख्य कारण आधुनिक पद्धतीची राहण्याची तऱ्हा हे आहे. लंडनमध्ये मानसिक आरोग्याविषयी भरविण्यात आलेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेतील तज्ज्ञांनी हा निष्कर्ष काढलेला आहे. परिषदेसाठी निरनिराळ्या देशांतील २,५०० मानसशास्त्रज्ञ जमले होते. त्यांनी आधुनिक जीवनपद्धतीच्या सर्व अंगोपांगांची कसून तपासणी केली. त्यांच्या मताने जुन्या पिढीतील लोक तांत्रिक बदलाच्या ह्या युगात बावरल्यासारखे झालेले आहेत. उलटपक्षी, तरुण गोंधळलेले असून आपला गोंधळ ते कामवासना, अंतःशांतीसाठी घेण्यात येणारी औषधे आणि केवळ ठेक्याचे संगीत ह्यांच्यामागे दडवू पाहात आहेत.

## ओसाड सहारा वाळवंट फुलविण्याचा प्रयत्न

जगाची लोकसंख्या अतिशय वेगाने वाढत चालली आहे. त्यामुळे नव्याने जन्मास येणाऱ्या लोकसंख्येला अन्नाचा पुरवठा करण्याचे काम तातडीचे झाले आहे. लक्षावधी नव्हे कोट्यवधी लोकांचे जगणे अथवा मरणे अन्नाच्या पुरवठ्याच्या शक्यतेवर हेलकावे खात आहे. सर्व जगभरची सरकारे आणि शास्त्रीय संशोधक अधिक धान्य व अन्नपदार्थ उत्पादन करण्याचे कसोशीचे प्रयत्न करीत आहेत. वालुकामय व म्हणून नापीक जमीन आणि समुद्राचे तळही त्यांच्या प्रयत्नांच्या कक्षेतून सुटलेले नाहीत. पडीक नापीक जमीन लागवडीयोग्य करण्याचा एक फार मोठा प्रयत्न सध्या आफ्रिकेत करण्यात येत आहे. त्या खंडातील सहाराच्या वालुकामय प्रदेशाच्या भोवताली असलेले देश वाळवंटाचे सुपीक जमिनीत रूपांतर करण्याचा अवाढव्य खटाटोप करीत आहेत. सहाराचे विस्तीर्ण वाळवंट सुजल सुफल करण्यात यश आले तर ३८० कोटी लोकांच्या खाण्यापिण्याचा प्रश्न सुटू शकेल. जगाची सध्याची लोकसंख्या सुमारे ३३० कोटी आहे. सहारा लागवडीयोग्य करण्याची योजना आखण्यासाठी न्यूझीलंडमधील एका तांत्रिक सल्लागाराची मदत घेण्यात येत आहे. ह्या विषयासंबंधी बोलताना ते म्हणाले की सध्या जगातील निरनिराळ्या देशांची सैन्ये एकमेकांविरुद्ध लढण्याच्या पवित्र्यात आहेत अगर प्रत्यक्ष लढत आहेत. त्यांनी आपला मोर्चा सहाराचे हिरवळीत रूपांतर करण्याकडे वळविला तर आठ वर्षांच्या अवधीत १० कोटी लोकांचे पुनर्वसन घडवून आणता येईल. सहाराच्या ५० लाख चौरस मैलांपैकी ३० लाख चौरस मैल जमीन खडकाळ आहे. परंतु उरलेली २० लाख चौरस मैल जमीन लागवडीखाली आणता येईल. कारण तेथे भूमिगत पाण्याचा साठा आहे.

सहारा फुलविण्यासाठी पावसावर अवलंबून राहण्याचे कारण नाही. नवे तंत्रज्ञान वापरून भूमिगत पाण्याचा उपयोग करता येण्यासारखा आहे. वाळवंटातील वाळूच्या व रेतीच्या अस्थिर टेकड्या स्थिर करण्यासाठी त्यावर झाडे लावण्यात येत आहेत. भारतामधील वालुकामय प्रदेशांचा विस्तार थांबविण्यासाठीही ह्या तंत्राचा उपयोग होऊ शकेल. सहारा सुपीक झाला तर जगाला एक नवे खंडच सापडल्यासारखे होणार आहे. ह्या रूक्ष प्रदेशात लोखंडाचे खनिज, मँगेनीज, हिरे, खनिज तेल, युरेनिअमयुक्त माती, इत्यादी नैसर्गिक संपत्ती मोठ्या प्रमाणावर आहे. सहारा वाळवंटावर माणसाने प्रयत्नपूर्वक विजय मिळविला नाही तर वाळवंटच माणसाचा नाश करील. काही काठावरच्या भागांत हे वाळवंट दरसाल ३० मैल इतक्या वेगाने पसरत चालले आहे. त्याचा हा भयानक विस्तार थोपविण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे वृक्षराजींची एक जिवंत भिंतच त्याच्या परिसरावर उभी करणे. वृक्षांची पाळेमुळे जमिनीत रुजू लागली की वाळू एकवट होऊन इकडेतिकडे पसरणार नाही. नंतर प्रक्रियेने तेथे सुपीक जमीन होईल. सहारा प्रदेशात एके काळी जंगल पसरलेले होते. पण शेळ्यामेंढ्या व इतर चराऊ गुरे ह्यांनी जंगलाचा फन्ना उडवला व ओसाड रूक्ष प्रदेश निर्माण केला. सुमारे ७ व्या शतकात ह्या अरण्यमय प्रदेशात १० लाख लोक वस्तीसाठी आले. प्रत्येकाने सुमारे १०० शेळ्यामेंढ्या बरोबर आणल्या. त्यांनी जंगल फस्त केले आणि त्याची वाढ रोखली. ह्या भटक्या शेतकरी जमातीने झाडांचा नाश करून ती जमीन गव्हाच्या पिकाखाली आणली. हा प्रकार शेकडो वर्षे चालू राहिला. जंगल तुटले, पाण्याचा जमिनीतील मुरावा कमी कमी होत गेला आणि शेवटी पाणी भूमीत खोल गेले; पिके काढणे अशक्य झाले.

---

## कापडाच्या गिरण्यांचा नफा का घसरला!

हिंदी कापडगिरण्यांनी भारी दराने कर्जे घेतली, त्यामुळे त्यांचा नफा कमी होत चालला आहे, असे व्यापार मंत्री श्री. दिनेशसिंग ह्यांनी राज्यसभेत सांगितले. गिरण्यांनी १९६०-६१ मध्ये १५४ कोटी रु. कर्जाऊ घेतले होते. १९६५-६६ मध्ये ही रक्कम ३०३ कोटी रु. वर गेली. व्याजाची रक्कम ९·१६ कोटी रु. ची २४·११ कोटी रु. झाली. एकूण भांडवलाशी ठोक नफ्याचे प्रमाण १३·२% वरून ५·९% वर उतरले.

---

## राणीचे बकिंगहॅम राजवाड्यातील जीवन

राणी एलिझाबेथने बकिंगहॅम राजवाड्यातील आपल्या राणी ह्या नात्याच्या दिनचर्येची फिल्म घेण्यास परवानगी दिली आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे हे जीवन जगाला प्रथमच पाहावयास मिळणार आहे.

---

## शेवाळे खाणाऱ्या जपानी माशांची आयात

वल्हविण्याची ऑलिंपिक शर्यत ज्या नदीत होणार आहे, तेथे खूप शेवाळे माजले आहे. त्यामुळे शर्यतीला व्यत्यय येईल. हे शेवाळे खाऊन टाकणारे २०,००० मासे जपानमधून विमानाने आणण्यात आले आहेत. स्वतःच्या वजनाच्या एकदशांश वजनाइतके शेवाळे हे मासे दररोज भक्षण करतात. त्यांची आजची ४ सेंटिमीटर लांबी दोन महिन्यांत १५ सेंटिमीटर होईल, अशी अपेक्षा आहे.

---

## राज्य सरकारांचे भारत सरकारला ५१९६ कोटी रु. देणे

राज्य सरकारांनी भारत सरकारचे एकूण ५१९५·५५ कोटी रु. देणे आहे. देणेकऱ्यांत पहिला अनुक्रम उत्तरप्रदेशचा ( ५९४·१५ कोटी रु ) लागतो. बिहारचे वार्षिक उत्पन्न कमी असूनही कर्जदारात त्याचा अनुक्रम दुसरा (५१९·४८ कोटी रु.) आहे. त्याचे खालोखाल आंध्र प्रदेश ( ४९१·४३ कोटी रु. ) व प. बंगाल ( ४७१·३३ कोटी रु. ) हे येतात. महाराष्ट्र हा भारत सरकारला ३७४·७६ कोटी रु. देणे लागतो.

## "उत्तर वेव्हारे धन जोडणारे" समाजाचे तारक आहेत

### सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगी श्री. शंतनुराव किर्लोस्कर यांचे विचार

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी संपत्तीची भक्तिभावाने पूजा करायची आणि मग मात्र वर्षभर संपत्तीला आणि ती कमाविणाऱ्यांना समाजद्रोही म्हणायचे ही परस्परविरोधी वागणूक आपल्या समाजात आजकाल का आढळून येते, त्याचा शोध प्रत्येकाने घेतला पाहिजे. या वागणुकीचे मूळ कारण असे आहे की आपल्या मनात पैसा या जीवनातल्या महत्त्वाच्या घटकाबद्दल अनेक गैरसमज आहेत. पैसा आपल्याला हवा असतो, आपण त्याला 'लक्ष्मी' हे नाव देऊन पवित्र मानतो आणि त्याची पूजा करतो. आपल्या देशाला पैसा मिळावा म्हणून आपण जगभर त्याच्यासाठी भीक मागतो पण हे सर्व करीत असता मात्र आपल्या सामाजिक जीवनात पैसा हे पाप आहे असा प्रचारही आपण करतो. भरपूर पैसा मिळविणारी माणसे आणि संघटना यांना समाजविरोधी समजतो. एवढेच नव्हे, तर एखाद्या व्यक्तीची भरपूर पैसा मिळविण्याची इच्छाही आपण मारून टाकतो. आपण स्वतः पैसा मिळविण्यासाठी धडपड करतो आणि दुसऱ्याने मिळविलेल्या पैशांचा नाश करण्यालाही कचरत नाही. पैसा हे जुलूम आणि अन्याय याचे प्रतीक आहे, असे प्रतिपादनही करतो. आपल्या वागण्यात अशी विसंगती का झाली? कारण पैशाचे खरे रहस्य आपल्याला कळलेलेच नाही.

आपल्या आर्थिक व्यवहारांचा व प्रगतीचा 'पैसा' हा एक महत्त्वाचा घटक आहे. हा पैसा मिळवायचा म्हणजे ज्या समाजात आपण वावरतो त्याच्यासाठी आपल्याला काही त्याग करावा लागतो. या समाजाला आपण जेव्हा काही देऊ तेव्हाच त्याच्याकडून आपल्याला काही घेण्याचा अधिकार प्राप्त होतो. कुणी किती पैसा मिळवावा, याचे ठराविक असे काहीही नियम नाहीत.

आपल्या साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करून त्यांतून जास्तीत जास्त मोबदला मिळविणे हेच उद्दिष्ट कुठल्याही व्यावसायिक संघटनेचे असते, याला सहकारी संघटनाही अपवाद नसाव्यात.

या चळवळीच्या पवित्र ध्येयाशी अगदी विसंगत ध्येये आणि उद्दिष्टे असलेले लोक या चळवळीत शिरले आहेत. सहकारी बँकाही अशा लोकांपासून दूर राहिलेल्या नाहीत.

सहकारी संघटनांना सरकारने पाठीशी घालणे किंवा त्यांच्या वाढीवर निर्बंध घालणे ही दोन्हीही चुकीची धोरणे आहेत. त्याऐवजी सहकारी संघटनांना आपल्या लायकीवर जगू द्या. जे लायक असतील ते जगतील. एखादी कार्यक्षम सहकारी संघटना एखाद्या अकार्यक्षम व्यापारी कंपनीला मागे टाकील. हे सारे व्यावसायिक कौशल्यावर अवलंबून आहे. सहकारी संघटना म्हणजे गाईसारखी सोज्वळ आणि पवित्र व व्यापारी संघटना म्हणजे समाजभक्षक हिंस्र पशू, असे गैरसमज ठेवण्याचे काही कारण नाही. या दोन्ही संघटनांतील चढाओढीचा निर्णय त्यांच्या कार्यपद्धतीवर आणि कौशल्यावर अवलंबून राहील. अशा चढाओढीमुळे सर्वांचाच फायदा होईल.

समारंभाच्या सुरवातीला बँकेच्या प्रगतीची कल्पना बँकेचे चेअरमन श्री. वसंतराव पंडित यांनी दिली. १९० सभासदांनी ६००० रु. भांडवल एकत्र करून १९१८ साली बँकेची सुरवात केली होती. ती सारस्वत बँक आता सहकारी क्षेत्रातील उत्तम बँक म्हणून नावारूपास आली आहे व तिच्या ८ शाखा असून, ६ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. बँक छोटे उद्योगधंदे चालविणाऱ्यांना विशेष मदत करते, असे श्री. पंडित यांनी सांगितले.

### अमेरिकेत परदेशी मोटारींची स्पर्धा

अमेरिकेत परदेशी मोटारगाड्यांची आयात वाढत आहे. चालू वर्षी १० लक्ष मोटारगाड्यांची आयात होईल. ह्या सर्व मोटारगाड्या लहान व स्वस्त असतात. तेव्हा, त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी अमेरिकन कारखानदार छोट्या व स्वस्त मोटारगाड्यांचे उत्पादन करणार आहेत.

---

**एअर इंडिआसाठी नवे विमान**—एअर इंडिआ इंटरनॅशनलने बोइंग जातीचे एक नवे विमान खरेदी केले आहे. विमानाने लंडन ते मुंबई हा प्रवास एकाच झेपेत केला. विमानाला 'त्रिशूल' असे नाव देण्यात आले आहे. त्यासाठी ६·१५ कोटी रुपये किंमत द्यावी लागली. विमानाचा उपयोग माल व प्रवासी दोन्ही वाहतुकीसाठी करता येतो.

**कॅनडाकडून मिळालेले कर्ज**—कॅनडाच्या सरकारने भारताला ८८ लाख डॉलर्सचे कर्ज मंजूर केले आहे. कर्जाची रुपयांतील किंमत ६·१६ कोटी रुपये होते. कॅनडात तयार केलेली डिझेल रेल्वे एंजिने व इतर रेल्वेचे सामान विकत घेण्यासाठी ह्या कर्जाचा उपयोग करावयाचा आहे. कर्जावर व्याज आकारण्यात येणार नाही. एंजिनांचे सुटे भागही कर्जाचा वापर करून भारताला विकत घेता येतील. सुट्या भागांची एंजिनेही तयार करता येतील.

**हाँगकाँगमधील महागाई**—हाँगकाँगमधील बेफाट महागाईच्या कक्षेतून मृतसुद्धा सुटत नाहीत. १९३२ मध्ये एखादा माणूस मृत पावल्यावर त्याच्यासाठी दफनपेटी विकत घेण्यासाठी १ डॉलर किंमत पडे. आता अशी दफनपेटी मिळविण्यासाठी कमीत कमी २७ डॉलर्स व जास्तीत जास्त १६७ डॉलर्स पडतात. हाँगकाँगमधील काही कुटुंबे आता दफनपेट्या विकण्याचा धंदा करतात.

**रशिआने देऊ केलेल्या शिष्यवृत्त्या**—१९६८-६९ ह्या वर्षी पदवीनंतरच्या अभ्यासक्रमासाठी ३५ शिष्यवृत्त्या रशिआने देऊ केल्या होत्या. त्यासाठी ३५ जणांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील श्री. सी. डी. कर्वे ह्यांची शेतीच्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. सर्व शिष्यवृत्त्या निरनिराळ्या विषयांतील संशोधन करण्यासाठी आहेत.

## सामाजिक नियंत्रणाखालील बँका

बँकांच्या व्यवस्थापनाचे आणि निर्णयाचे केंद्र म्हणजे संचालक मंडळे. बँकिंगविषयक नव्या सामाजिक नियंत्रणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांच्या पुनर्रचनेस अग्रस्थान देण्यात आले आहे. १६ प्रमुख बँकांनी तज्ज्ञ व्यवस्थापकांना चेअरमन आणि चीफ-एक्झिक्युटिव्ह नेमले आहे. पूर्वी संचालक मंडळाचे नियंत्रणाखाली काम करणारे आता संचालक मंडळाचे प्रमुख झाले आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे १४ प्रमुख बँकांतील उद्योगपती, व्यापारी व धंदेवाले असलेले ४१ संचालक मंडळातून निवृत्त होऊन ५४ नवे संचालक आले आहे. त्यांना खालील क्षेत्रांचे खास ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव आहे :—

| | |
|---|---|
| शेती | ११ |
| लघुउद्योग | १० |
| हिशेबपद्धती | ९ |
| अर्थशास्त्र | ८ |
| सहकार | ६ |
| कायदा | ५ |
| बँकिंग | ५ |
| एकूण | ५४ |

हे बदल लक्षात घेता, ह्या बँकांच्या १६६ संचालकांची वर्गवारी खालीलप्रमाणे होते :—

१ कारखाने, व्यापार, उद्योगधंदा ह्यांचे प्रतिनिधी ६४
२ इतर क्षेत्रांचे प्रतिनिधी

| | |
|---|---|
| बँकिंग | १९ |
| शेती | १६ |
| लघुउद्योग | १५ |
| कायदा | १३ |
| अर्थशास्त्र | १० |
| हिशेबपद्धती | १० |
| सहकार | ९ |
| कर्जपुरवठा | ५ |
| व्यवस्थापन सल्लागार | २ |
| कारभार तज्ज्ञ | १ |
| इतर | २ |
| | १०२ |
| | १६६ |

भारतामधील विदेशी बँकांनी नेमलेल्या सल्लागार मंडळात एकूण ४७ सभासद असून त्यांचे खास ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव खालीलप्रमाणे आहे :—

| | |
|---|---|
| बँकिंग व फिनॅन्स | १२ |
| लघुउद्योग | ९ |
| कायदा | ७ |
| उद्योगधंदे | ६ |
| हिशेबपद्धती | ५ |
| शेती | २ |
| अर्थशास्त्र | २ |
| व्यवस्थापन व कारभार | २ |
| व्यापार | १ |
| इतर | १ |
| | ४७ |

हिंदी बँकांच्या बाबतीत संचालक मंडळाकडून जी अपेक्षा आहे, तीच विदेशी बँकांच्या बाबतीत ह्या सल्लागार मंडळाकडून आहे.

बँकांच्या कर्जांपैकी बहुसंख्य कर्जे आता उद्योगधंद्यांना दिली जातात; १५ वर्षांपूर्वी ती मुख्यत: व्यापाराला दिली जात असत. येत्या १० वर्षांत शेतीला दिलेली कर्जे महत्त्वाचे स्थान प्राप्त करून घेतील, असा अंदाज आहे. शेतीला कर्जे देण्याची बँकांची पात्रता मर्यादित आहे; तेव्हा ठेवीत वाढ करून ती पात्रता वाढविण्याचा बँकांचा प्रयत्न चालू आहे. १९६० पासून आतापर्यंत शेड्यूल्ड बँकांनी २,६७४ नव्या शाखा उघडल्या, त्यांपैकी १,०३० शाखा पूर्वी एकही बँककचेरी नव्हती, अशा ठिकाणी उघडण्यात आल्या. जेथे पूर्वी बँकिंगची सोय होती अशा ठिकाणी उघडलेल्या १,६४४ नव्या कचेऱ्यांपैकी पुष्कळशा कचेऱ्या ग्रामीण आणि अर्धनागरी विभागातून उघडण्यात आल्या. ग्रामीण आणि अर्धनागरी विभागातील नव्या शाखांची संख्या ह्यापुढे वाढतच जाणार आहे. नव्या शाखांना पहिली पाच वर्षे तरी खर्च बराच येतो आणि त्या किफायतशीर होण्यास बराच काळ लोटावा लागतो. तरीसुद्धा बँका ही जबाबदारी उत्साहाने स्वीकारीत आहेत, असे इंडियन बँक्स असोसिएशनने म्हटले आहे.

### प्रिन्स चार्लससाठी हिंदी प्राध्यापक

ब्रिटिश गादीचा वारस, प्रिन्स चार्लस, डॉ. अनिल सील ह्या हिंदी प्राध्यापकाच्या हाताखाली केंब्रिज येथील ट्रिनिटी कॉलेजात इतिहासाचे शिक्षण घेईल. ३० वर्षांचे हे प्राध्यापक १९ वर्षांच्या प्रिन्सला दोन वर्षे इतिहास शिकवितील. डॉ. सील हे स्वत: ट्रिनिटी कॉलेजचेच माजी विद्यार्थी आहेत.

### मानसिक रोगात वाढ

मानसिक रोग सर्व जगातच भयानक प्रमाणावर वाढत आहेत, असे लंडनमधील २,५०० तज्ज्ञांचे मत आहे.

### रशिआतील आर्थिक विषमता कमी होऊ लागली

रशिआत निरनिराळ्या प्रकारची कामे करणाऱ्या लोकांना मिळणाऱ्या वेतनातील तफावत कमी होऊ लागली आहे. स्टॅलिनच्या अमदानीत वेतनातील फरक फार मोठ्या प्रमाणावर होता. अजूनही उद्योगधंद्यांतील वरिष्ठ अधिकारी आणि तज्ज्ञ ह्यांना इतरांच्या मानाने भरपूर वेतन देण्यात येते. पण, वेतन-गटांतील तफावत आता बरीच कमी आली आहे. १९५५ अखेर एंजिनिअर्स, वरिष्ठ औद्योगिक अधिकारी आणि इतर तज्ज्ञ ह्यांना सामान्य मजुरांच्या तुलनेने २.३ पटीने अधिक वेतन मिळत होते. १९५५ ते १९६६ ह्या काळात शारीरिक श्रमाची कामे करणाऱ्यांच्या वेतनात १०० टक्के वाढ करण्यात आली. ह्याच काळात वरिष्ठ गटांतील अधिकाऱ्यांच्या वेतनातील वाढ मात्र ५० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्यात आली. १९६६ साली रशिआतील सामान्य कामगार दरमहा सरासरी सुमारे ११५ डॉलर्स मिळवीत असे. इंजिनिअर्स व इतर औद्योगिक अधिकारी दरमहा सुमारे १३५ डॉलर्स मिळवीत असे. कारकुनी पेशातील लोकांचे सरासरी वेतन मात्र दरमहा सुमारे ९७ डॉलर्स इतकेच होते. निरनिराळ्या उद्योगधंद्यांत पाहिजेत तितके व पाहिजेत तसे शिक्षित कामगार मिळविण्यात रशिअन सरकारला अद्यापही अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील कामगारांच्या वेतनश्रेणीत बराच फरक ठेवण्याचा उपाय तेथेही योजला जातो. रशिआत सध्या सर्वांत अधिक चांगली वेतनश्रेणी कोळशाच्या खाणीतील कामगारांना मिळते. ह्या धंद्यातील कामगारांचे वेतन दरमहा सरासरी २१५ डॉलर्स इतके पडते. त्याच्या खालोखाल मच्छीमारीत गुंतलेल्या लोकांना वेतन मिळते.

---

### पुराचा तडाखा देणारी तापी नदी

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तापी नदीला आलेल्या भयंकर पुराने हाहाकार उडविला. तापीला पूर येण्याचे प्रसंग बऱ्याच वेळा येतात. चालू शतकाच्या प्रारंभापासून ह्या नदीला १२ वेळा पूर आलेले आहेत. जुन्या काळी आलेल्या पुरांत १८२७ साली आलेल्या पुराची नोंद आढळते. अलीकडे १९५९ सालीही नदीला खूप मोठा पूर आला होता. त्या वेळी ७७ माणसे दगावली होती. सुमारे ३०० चौरस मैल प्रदेश पाण्याखाली बुडाला होता आणि ५५ हजार एकर जमिनीतील पिके वाहून गेली होती. पुराच्या लोंढ्यामुळे १६ हजार घरे आणि झोपड्या नाश पावल्या होत्या. सुरत शहरात ठिकठिकाणी ३ ते १२ फूट पाणी साठले व ते ओसरण्यास ७२ तासांचा अवधी लागला. पुरामुळे ५ कोटी रुपयांच्या मालमत्तेची हानी झाली. तापीला पूर येण्याचे प्रसंग अलीकडे वाढत चालले आहेत.

अर्थ (पाक्षिक) महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते. वा. व. रु. ६=०० ट. ख. सह "दुर्गाधिवास" पुणे ४.






हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.